सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
विद्यार्थी विकास मंडळ
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७.

डॉ. सविता कुलकर्णी
संचालक (अतिरिक्त कार्यभार)

संदर्भ क्र. विविमं/२०२५–२६/७५४ **मुदतवाढ** दिनांक : २५/०३/२०२६

प्रति,
**मा. प्राचार्य/संचालक**
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित
सर्व महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था.

विषय :– माहे मार्च, एप्रिल व मे २०२६ अखेर या कालावधीत कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका' योजनेचे प्रस्ताव ऑनलाईन पद्धतीने भरण्यास विशेष मुदतवाढ.

संदर्भ :– परिपत्रक क्र. ३५/२६, दि. १०/०३/२०२६.

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भीय परिपत्रकान्वये आपल्या महाविद्यालयात/मान्यताप्राप्त परिसंस्थेमध्ये माहे मार्च, एप्रिल व मे २०२६ अखेर या कालावधीत (परीक्षा कालावधी व सार्वजनिक सुट्ट्या सोडून) 'कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका' योजना राबवायची आहे, त्यांना उपरोक्त योजनेतील मार्गदर्शकतत्वांच्या अधिन राहूनच सदर योजना राबविण्याची अनुमती देण्याकरिता ऑनलाईन पद्धतीने प्रस्ताव बुधवार, दि. २५ मार्च, २०२६ पर्यंत भरण्याबाबत कळविण्यात आले होते.

वरील **संदर्भीय परिपत्रकाच्या अधिन राहूनच माहे मार्च, एप्रिल व मे २०२६ अखेर या कालावधीत (परीक्षा कालावधी व सार्वजनिक सुट्ट्या सोडून) 'कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका' योजनेचे ऑनलाईन पद्धतीने प्रस्ताव भरण्याची मुदत बुधवार, दि. ०१ एप्रिल, २०२६ पर्यंत वाढविण्यात येत आहे.**

माहे मार्च, एप्रिल व मे २०२६ अखेर या कालावधीत योजनेत सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांचा पात्रता क्रमांक, (Eligibility No.) विद्यार्थ्यांची शाखा व वर्गनिहाय यादी, त्यांना देण्यात येणारे काम व वेळ, बँक खाते क्रमांक या माहितीच्या आधारे सदर प्रस्ताव (www. unipune.ac.in – Students' Developement – BOD Online –Login – Main Menu – Students Developement – Menu – Summer Vacation K.B.P. Earn & Learn Scheme Proposal) ह्या लिंकवर ऑनलाईन (Online) पद्धतीने भरावेत, **सदर भरलेल्या प्रस्तावाची प्रिंट काढून त्यावर मा. प्राचार्य/संचालक यांची स्वाक्षरी घेऊन सदर स्वाक्षरी असलेले अर्ज स्कॅन करून तिथेच अपलोड करावेत**, म्हणजे आपल्या प्रस्तावातील प्रस्तावित दिनांकापासून मान्यता देणेबाबत या कार्यालयाकडून पुढील योग्य ती कार्यवाही करणे सोयीचे होईल.

आपण संबंधित विभागांना/शिक्षकांना बुधवार, दि. ०१ एप्रिल, २०२६ या वाढीव मुदतीत वरीलप्रमाणे माहे मार्च, एप्रिल व मे २०२६ अखेर या कालावधीत कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका' योजनेचे प्रस्ताव ऑनलाईन पद्धतीने भरून स्कॅन करून तिथेच अपलोड करण्याबाबत योग्य ती कार्यवाही करण्याबाबत अवश्य सूचित करावे. कळावे, ही विनंती.

सोबत : वरीलप्रमाणे.

**(डॉ. सविता कुलकर्णी)**
संचालक, (अतिरिक्त कार्यभार)
विद्यार्थी विकास मंडळ

**ऑनलाईन प्रपत्र/अर्ज दुरूस्ती व तांत्रिकतेबाबत अधिक माहिती व मदतीसाठी : ०२०–७१५३३६३३**
Email: nssbsdsupport@pun.unipune.ac.in
**विद्यार्थी विकास मंडळ कार्यालयीन अधिक माहितीसाठी : ०२०–२५६२२६८०/२६८१**

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

विद्यार्थी विकास मंडळ

**: परिपत्रक क्र. ३५/२६ :**

या परिपत्रकाद्वारे आपणास कळविण्यात येते की, विद्यापीठाने विद्यार्थीहिताचे अनेक निर्णय घेतले आहेत. त्याच अनुषंगाने विद्यार्थ्यांच्या शिक्षणास अनेक प्रकारे साहाय्यभूत ठरणारी कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजना माहे मार्च, एप्रिल व मे २०२६ अखेर या कालावधीत विशेष बाब म्हणून सुरू ठेवण्यास मा. कुलगुरू यांनी मान्यता दिली आहे. त्यानुसार ज्या महाविद्यालयात/मान्यताप्राप्त परिसंस्थेमध्ये माहे मार्च, एप्रिल व मे २०२६ अखेर या कालावधीत (परीक्षा कालावधी व सार्वजनिक सुट्ट्या सोडून) 'कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका' योजना राबवायची आहे, त्यांना उपरोक्त योजनेतील मार्गदर्शकतत्वांच्या अधिन राहूनच सदर योजना राबविण्याची अनुमती देण्याकरिता पुढीलप्रमाणे ऑनलाईन पद्धतीने प्रस्ताव बुधवार, दिनांक २५ मार्च, २०२६ पर्यंत मागविण्यात येत आहे.

माहे मार्च, एप्रिल व मे २०२६ अखेर या कालावधीत या योजनेवर झालेल्या खर्चाचा हिशेब २०२६–२७ या आर्थिक वर्षात सादर करावा. या कालावधीत केलेल्या खर्चाचा अतिरिक्त विचार न करता सदर खर्च हा मार्च २०२६ ते फेब्रुवारी २०२७ या काळात त्या त्या महाविद्यालये/परिसंस्थांना विद्यापीठ धोरणानुसार ठरवलेल्या कमाल विद्यार्थी संख्येच्या अनुपातात मिळणारी जी मर्यादित रक्कम आहे, त्या एकूण रक्कमेचाच ती भाग समजून मंजूरी देण्यात येईल. या कालावधीतील कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजनेचा खर्च अतिरिक्त न मिळता सन २०२६–२७ या वर्षातील प्रचलित प्राप्त अनुदानातच गृहीत धरला जाईल.

१. शासन व स्थानिक प्रशासनाच्या सर्व नियम व निर्बंधाच्या अधीन राहूनच या योजनेची अंमलबजावणी करावी. शासन व स्थानिक प्रशासन यांच्याद्वारा वेळोवेळी जारी होणाऱ्या आदेशाच्या अधीन राहूनच या योजनेची अंमलबजावणी, कार्यान्वियन, स्थगिती अथवा समाप्ती करणे बंधनकारक असून याबाबत महाविद्यालय/परिसंस्थेने आपल्या स्तरावर योग्य ते निर्णय घ्यावेत.

अ) **कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजनेच्या नियमावलीनुसार या योजेनतील सहभागी प्रत्येक/सर्व विद्यार्थ्यांना त्यांचे मानधन प्रत्येक महिन्याच्या समाप्तीनंतर तात्काळ लगतच्या पुढील महिन्यात १२ तारखेपर्यंत संबंधित प्रत्येक/सर्व विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात जमा करणे अनिवार्य आहे. असे न झाल्यास त्या त्या महिन्याचे अदा केलेले मानधन लेखापरीक्षणातून वगळले जाईल आणि विद्यापीठाकडून अशा विलंब केलेल्या मानधनाचे अनुदान मिळणार नाही.**

ब) **योजनेत सहभागी प्रत्येक/सर्व विद्यार्थ्यांच्या कामकाजाबाबतची माहिति प्रत्येक महिन्याच्या समाप्ती नंतर तात्काळ लगतच्या महिन्याच्या १५ तारखेपर्यंत विद्यार्थी विकास मंडळाच्या लिंक मध्ये क. भा. प. कमवा व शिका Student Monthwise Work Summary येथे ऑनलाइन पद्धतीने भरणे अनिवार्य आहे. याच लिंक वर त्या–त्या महिन्यातील एकूण विद्यार्थ्यांचे एकत्रित हजेरी पत्रक, मानधन बँकेत जमा केल्याची बँक पोच (Bank O/C) व विद्यार्थी कामकाजाचे कोणतेही ०२ फोटो अपलोड करणे अनिवार्य आहे.**

क) विद्यार्थी विकास मंडळाच्या निर्देशानुसार सदर योजनेत सहभागी विद्यार्थ्यांना दररोज व सलग जास्तीत जास्त तीनच तास काम देता येईल.

ड) सदर योजनेतील सहभागी विद्यार्थ्यांना श्रमाचे महत्त्व व एकूण स्वरूप लक्षात येण्यासाठी आळीपाळीने कार्यालयीन व क्षेत्रीय कामकाज देण्यात यावे.

इ) योजनेतील सहभागी विद्यार्थ्यांना परीक्षा कालावधी व सार्वजनिक सुट्ट्या सोडून काम देण्यात यावे.

याकरिता माहे मार्च, एप्रिल व मे २०२६ अखेर या कालावधीतील या योजनेकरिता योजना सुरू करण्यापूर्वी प्रस्ताव पाठवून मान्यता घेणे आवश्यक आहे. सदर कालावधीत योजनेत सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांचा पात्रता क्रमांक, (Eligibility No.) विद्यार्थ्यांची शाखा व वर्गनिहाय यादी, त्यांना देण्यात येणारे काम व वेळ, बँक खाते क्रमांक या माहितीच्या आधारे **सदर प्रस्ताव (www. unipune.ac.in –BOD Online/ BSD Online – Login – Online Services – Students' Development – Menu – Summer Vacation K.B.P. Earn & Learn Scheme Proposal) ह्या लिंकवर ऑनलाईन (Online) पद्धतीने बुधवार, दिनांक २५ मार्च, २०२६ या कालावधीत भरावेत. सदर भरलेल्या प्रस्तावाची प्रिंट काढून त्यावर मा. प्राचार्य/संचालक यांची स्वाक्षरी घेऊन सदर स्वाक्षरी असलेले अर्ज स्कॅन करून तिथेच अपलोड करावेत,** म्हणजे आपल्या प्रस्तावातील प्रस्तावित दिनांकापासून मान्यता देणेबाबत या कार्यालयाकडून पुढील योग्य ती कार्यवाही करणे सोयीचे होईल. वरीलप्रमाणे संपूर्णपणे विहित ऑनलाईन (Online) पद्धतीने भरून **स्कॅन करून अपलोड झालेल्या व विद्यार्थी विकास मंडळास ऑनलाईन पद्धतीने प्राप्त झालेले प्रस्तावच पुढील कार्यवाहीसाठी विचाराधिन असतील.**

**बुधवार, दिनांक २५ मार्च, २०२६ सायंकाळी ०६.०० नंतर विद्यार्थी विकास मंडळाच्या संकेतस्थळावरील संबंधित लिंक तात्काळ अनुपलब्ध होईल.** वरील मुदतीनंतर सादर केलेल्या प्रस्तावाचा मान्यतेसाठी विचार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**शैक्षणिक वर्ष २०२६–२७ मधील कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजनेअंतर्गत नियमित प्रस्ताव जून, २०२६ मध्ये मागवले जातील. त्या संदर्भातील विस्तृत पत्र जून, २०२६ मध्ये प्रदर्शित केले जाईल. त्या पत्रानुसार सध्याच्या माहे मार्च ते मे, २०२६ या व्यतिरिक्त शैक्षणिक वर्ष २०२६–२७ या कालावधीची संपूर्ण वर्षभराची परवानगी घेण्याकरिता नव्याने प्रस्ताव पाठवणे बंधनकारक आहे.**

**विद्यार्थी विकास मंडळ**
**गणेशखिंड, पुणे – ०७.**
**दिनांक : १० मार्च, २०२६**
**जावक क्र : २०२५–२६/६८७**

**(डॉ. सविता कुलकर्णी)**
संचालक, (अतिरिक्त कार्यभार)
विद्यार्थी विकास मंडळ

**प्रत माहिती व योग्य कार्यवाहीसाठी :**

१) मा. कुलगुरू यांचे कार्यालय.
२) मा. प्र-कुलगुरू यांचे कार्यालय.
३) मा. कुलसचिव यांचे कार्यालय.
४) मा. वित्त व लेखाधिकारी.
५) मा. प्राचार्य, सर्व संलग्न व स्वायत्त महाविद्यालये.
६) मा. संचालक, सर्व मान्यताप्राप्त परिसंस्था.